आंबट गोड कवितांचा संग्रह

# आलुबोरखार

आलुबोरखार

...रखडा ... नवरसमंजरी
योगायोग
आपली आवड
द्वंद्व
फुंकर
नाटक
ईशस्तवन
कमाई
श्रोता
...जी
मॅचिंग
लव्हमॅरेज
तोबातोबा
...
कायापालट
स्वप्नरंजन
धक्का
आलुबोरखार
आम्ही कोण?

पण्डित महाजन

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. 2393

REFBK-0021782
REFBK-0021782

वि. क्र.
२३९३
२१०८२
२५/८/०७
३/०५

# 'आ लु बो खा र'

( खुसखुशीत आंबटगोड कवितांचा संग्रह )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २३९३ का/०५
२१०८२
ग्रंथ शाखा (स्थळ ग्रंथ)

: लेखक :

पण्डित महाजन

REFBK-0021782
REFBK-0021782

त्रिदल प्रकाशन मुंबई

□

प्रकाशक : प्र. म. टिळक
त्रिदल प्रकाशन, प्रार्थना समाज,
गिरगांव–मुंबई–४

□

सर्व हक्क : सौ. विमल महाजन
२५२।५८ क्रांतिनगर,
मुंबई – ४०० ००४

□

प्रथमावृत्ति : 'गुढीपाडवा'
मार्च १९७७

□

मुद्रक : रा. गो. पाटील
ज्ञानेश्वरी प्रेस,
१४५७, शुक्रवार पेठ, पुणे २.

# प्र स्ता व ना

पण्डित महाजन ह्यांच्या ह्या काव्य संग्रहाला त्यांनी नांव दिलं आहे ( किंवा ठेवलं आहे म्हणा. ) 'आलु–बोखार.' हे नांवच मोठे मार्मिक असून ते त्यांच्या ह्या कविता संग्रहाचं स्वभाव दर्शन घडविणारे आहे. एकंदरीत रोजच्या बाजारांत आलु–बोखार हा दुर्मिळच आणि तो खायला जाणारा चोखंदळ खवैय्याही विरळाच. शिवाय मिळून मिळविलाच तरी त्याची चव आंबट, गोड, नी तुरट ह्याच चालीवर असे बिन दिक्कत म्हणता येईल की विनोदाकडे वळणारा लेखक एकंदरीत अपवादात्मकच ! त्यातून विनोदी काव्य लिहायला जाणारा कवि तर खरोखरी अपवाबात्मक.

विनोद सर्वांना आवडतो. पण साधायला हा वाङ्मय प्रकार अत्यंत अवघड. त्यातून निकोप, खेळकर, सशक्त वृत्तीतून जन्माला आलेला विनोद अलिकडे तर सहसा भेटेनासाच झाला आहे. अलिकडे तर क्रोध आणि सूडबुद्धि विनोदाचे पांघरूण वरकरणी घेऊन प्रच्छन्न निंदानालस्ती साधून घेताना दिसते. तेव्हा विनोदाच्या भवितव्याबद्दल भीती वाटते. म्हणूनच पण्डित महाजनांचा 'आलु बोखार' चाखायला मी जेव्हा हाती घेतला तेव्हा तो थोडासा चाखता क्षणीच वरवरच्या आंबट तुरटपणात लपलेला त्याचा मिठ्ठास गोडवा मला जाणवला आणि आश्चर्ययुक्त आनंदाने मन प्रफुल्लित होऊन गेले. पण्डित महाजनाच्या ह्या काव्य संग्रहात अनेक जातीच्या कविता असल्या तरी प्रामुख्याने आणि बहुसंख्येने नजरेत भरल्या त्या त्यांच्या विनोदी कविताच किंबहुना विनोदी कवितांच्या रचनेत त्याना अधिक यश मिळालेले आहे असे निश्चितपणे जाणवते. पण्डित महाजनांच्या काव्यातला विनोद हा संस्कृत काव्यातल्या विनोदाला अधिक जवळचा आहे. काहीसा नाजुक, खूपसा श्लेषप्रधान आणि अत्यंत मार्मिक अशी या विनोदाची जात आहे. संस्कृत काव्यातील प्रहेलिका आणि चुटके किंवा कूटे ह्यांचा त्यानी उत्तम अभ्यास केलेला असल्याने एखाद्या अभिजात

संस्कृत नाटकातल्या प्रत्युत्पन्नमति विदूषकाप्रमाणे ते शब्दाशब्दांमधल्या सूक्ष्म भेदातून अर्थांच्या अनंत मौजा करून दाखवितात. एखाद्याचा नाजुकश्या कोटीमधून हास्याची प्रसन्न झुळुक उठवून देतात.

त्यांच्या विनोदी कवितात विनोदाचे अनेक प्रकार त्यांनी यशस्वी रीतीने हाताळलेले दिसतात. विडंबनावर आधारलेला, कल्पना निष्ठ, श्लेषयुक्त, असा नाना प्रकारचा विनोद कवितातून त्यांनी साधला आहे. सर्वात अधिक बहार जर त्यानी कुठे उडवली असेल तर ती 'नवरस मंजिरी' ह्या विडंबन काव्यमालेतून आधीच ' ' झेंडूच्या फुला ' मधल्या ' नवरस मंजिरी ' तून आचार्य अत्रे ह्यांनी तत्कालीन कवींच्या प्रवृत्तीचे उत्तम विडंबन करून ठेवले आहे. त्यावरून प्रेरणा घेऊन त्याच परंपरेशी इमान राखून विडंबनातून नवरस निर्मिती साधावयाची हे काम अवघड होते. परंतु श्री. महाजन ह्यांनी ते कसोशीने आणि कुशलतेनं पार पाडले आहे. विशेषतः—

वत्सलरस ह्या कवितेतून सिगारेट ओढणाऱ्या पुत्राला विडी देऊ करणारा त्यांनी निर्माण केसेला वत्सल पिता त्यांच्या विनोदात हजर असलेल्या एकंदरीने दुर्मिळ अशा खिलाडूपणाची साक्ष देतो. चिरंजिवाच्या हाती विडीचे बंडल देत हे पिताजी अतीव मायाळूपणाने म्हणतात,

'तुला जरी ना तुझी काळजी
हवी परंतु मला घ्यायला
सिगारेट ना बरी परंतु
' विडी ' बरी ही तब्येतीला '

वर सांगितल्या प्रमाणे श्री. महाजन ह्यांचा संस्कृत काव्याचा अभ्यास उत्तम असल्याने श्लेष हा अलंकारही त्यानी क्वचित कुठे परिणाम कारकपणे वापरला आहे. ' आपली आवड ' ह्या कवितेतून कुणाला ' मीलन ' तर कुणाला ' चिकणी ' सुपारी आवडते तर कुणाला ' आवळा ' हीच सुपारी अधिक रुचते हे सांगून प्रीतीच्या वेगवेगळया तऱ्हांचे चहाते मिस्कीलपणे ह्या कवितेतून सुचविले आहेत. श्लेषावर आधारलेल्या नर्मं-

विनोदी कवितांची प्रकृती तशीं नाजूकच असल्यानें तिच्यातला विनोदही अतिशय बारकाईने आणि बारकाव्यातूनच शोधावा लागतो. त्यासाठी वाचकही मोठा प्रगल्भ रसिक असावा लागतो. तरच तो ह्या सूक्ष्म रहस्याचा भेद करू शकेल.

कधीं कधीं उत्तम व्यक्तिनिष्ठ विनोदातूनही श्री महाजनांची कविता स्फुरलेली दिसते. ‘ चुरस ’ ह्या कवितेत परस्परांच्या फॅशनचे आंधळे अनुकरण करणाऱ्या आधुनिक स्त्रियांची मजल एकमेकींच्या कवळ्यांचेही अनुकरण करण्यापर्यंत जाते हे सांगून मार्मिक—व्यक्तिदर्शना बरोबरच उत्तम ‘ अँटीक्लायमॅक्स ’ ही साधला आहे.

‘ पेच ’ या कवितेत मेनकेच्या अपत्याचें पितृपद नाकारणाऱ्या सुप्रसिद्ध विश्वामित्री पविञ्याला ‘ तो मी नव्हेच ’ नावाचा पेच संबोधून त्यानी आपल्या कल्पक प्रतिभेची लहानशी चुणुक दाखवली आहे खरी.

ह्या ठिकाणी मोजून दाखवायचेच जर झाले तर महाजनांच्या काव्यातील विनोदाचे अनेक उत्कृष्ट नमुने मोजून दाखवता येतील. पण त्यापेक्षा रसिक वाचकांनी हा काव्यसंग्रहच लक्षपूर्वक वाचावा आणि शुद्ध विनोदाची अलबुखारी चव चाखल्याचा आनंद मिळवावा असेच मी म्हणेन.

—शिरीष पै

कै. ‘ अप्पा आणि गंगा ’

यांच्या स्मृतीस

समर्पण

# आभार—

‘ मनुका ’ या माझ्या पहिल्या काव्य-संग्रहानंतर ‘ आलुबोखार ’ हा माझा दुसरा काव्य-संग्रह रसिकास सादर करीत आहे. कामाच्या अवाढव्य व्यापातून वेळांतवेळ काढून सौ. शिरीष पै यांनी रसिकतेने संग्रहाला प्रस्तावना दिल्याबद्दल मी अत्यंत आभारी आहे.

—पण्डित महाजन

# अनुक्रमणिका

( काही कविता संस्कृत सुभाषितांचा स्वैर अनुवाद आहे.)


| | पृष्ठ |
|---|---|
| ईश स्तवन | ९ |
| योगायोग | ९ |
| फुंकर | ९ |
| कमाई | १० |
| नाटक | १० |
| म्यांचिग | ११ |
| कायापालट | ११ |
| आपली आवड | १२ |
| श्रोता | १२ |
| गर्दी–विशेष | १३ |
| तोबा-तोबा | १३ |
| सांधा | १४ |
| अबोला | १४ |
| ‘ पळसाची पान ’ | १५ |
| ‘ कान ’ गोष्ट | १६ |
| डंख | १६ |
| काव्यगायन | १७ |
| चारोळ्या | १७ |
| धक्का | १८ |
| स्वप्नरंजन | १८ |
| छंद | १९ |
| कविता | २१ |
| आदर्श | २१ |
| स्वातंत्र्य वीराचा ‘ आत्मयज्ञ ’ | २२ |
| नंगेसे | २४ |
| लव (ह) मॅरेज | २५ |
| निसरडे | २५ |
| सांग कसे हसलो | २६ |
| तिस्तम्‌जा | २७ |
| रास–क्रीडा | २९ |
| मिठाची जाग | ३० |
| पश्चात्ताप | ३१ |
| आम्ही कोण ? | ३२ |
| बेगड | ३३ |

| | | | |
|---|---|---|---|
| नवरस मंजरी | ३४ | (आड) रान गीत | ५४ |
| ' वीर ' रस | ३५ | कृपा | ५६ |
| अद्भुत रस | ३६ | पहिले चुंबन | ५६ |
| ' बीबत्स ' रस | ३८ | बघा हा डौल | ५७ |
| माध्यम (आमच्या आम्ही) | ३९ | आई | ५८ |
| ' रौद्र ' रस | ४० | गर्व हरण | ५८ |
| ' करुण ' रस | ४१ | पाहुणी | ५९ |
| ' वत्सल ' रस | ४२ | गझल | ५९ |
| ' शान्त ' रस | ४३ | जुगलबन्दी | ६० |
| ' हास्य ' रस | ४४ | क्षितिज | ६१ |
| वतन–जतन–आणि पतन | ४५ | सौदा | ६२ |
| वर्दळ | ४७ | मानभंग | ६२ |
| भूतबंगला | ४८ | चुरस | ६३ |
| रोजखर्डा | ४९ | आस्था | ६३ |
| आडकाठी | ४९ | लज्जत | ६४ |
| पेंच | ५० | जीवन दर्शन | ६५ |
| गालबोट | ५० | शास्त्रीजी | ६६ |
| चोरांची पाउले | ५१ | आमचे आम्ही | ६७ |
| प्रेम–पत्रे | ५१ | सवाल जबाब | ६७ |
| एकमात्रा ' लूप ' ही | ५२ | बोहोचक मावशी | ६८ |
| साद | ५३ | पंचनामा | ६८ |

**ईश स्तवन–**

अग्रपूजा मान ज्याचा, वक्रतुन्ड दयानिधी ।
देवांचाही देव तो कीं, कार्यारंभी नमूं आधी ॥

* * *

**योगायोग–**

वर संशोधनी जेव्हा, निघतोहि तिथे पिता ।
'रसिका' घरीं पडावी, इच्छितो 'कविता सुता' ॥

'अ' मंगळ नको भीति, वर्णी ही त्याज्य ना तशी ।
नाकीं डोळी नेटकी ती, बांधेसूद दिसे अशी ॥

दावील नांदता ना ती, वावुगा परि 'मी' पणा ।
माहेर सासराला ही, आणील न कमी पणा ॥

योगायोग असे तो हा, पसंतीस पडे जरी ।
आशाभंग जरी होई, खंत काय ? पिता धरी ॥

* * *

**फुंकर–**

सांगावे असला मुळीच न इथे, दावाहि कांहीं तरी ।
सांगाया समही बरेचहि दिसे, ते मात्र कांहीं तरीं ॥

सारे जीवन प्रत्यही बनत, जे गंभीर अस्थीरही ।
मात्रा फक्त 'विनोद' फुंकर वरी, कीं व्हावया सह्यही ॥

* * *

**कमाई–**

रसिका रसिकांची कीं हर्षवी ‘ दाद ’ जीवनीं
जमेची ती एक बाजू, ‘ कमाई ’ फक्त जीवनीं–
मुळांतच रुची ती ही, अंबट–गोड असे तरी
‘ आलुबोरवार ’ चारवाया, देत हा ‘ रसिका ’ करीं–

* * *

**नाटक–**

जेव्हां येत फुलोनि नाट्य–गृहही
जैसा बगीचाच हा।
होई धुंद पहा अहा !! रसिक ही
जो तो तिथे मस्त हा ॥
घंटा नाद श्रवा घणाणत सवे
की धूप धूम्रातुनी ।
भासेही नटराज तो अवतरे
त्या मंद गंधातुनी ॥ १ ॥
होई नाटक त्यांतुनी बघ असे
संगीत तेही जरी ।
स्वर्गी काय असे तयाहुनि दुजे
त्या रंग मंचावरी ॥
जेथे नाटक नाट्य त्यांत नटही
कीं रंगताही फुले ।
तेथें खासचि साद दे रसिकता
रंगेल ती ही डुले ॥ २ ॥

* * *

## म्याचिंग–

काळी चप्पल काळी साडी, कंचुकीही काळीच होती
भुजा–नग्न कंचुकीतून, काळीच भुजा दिसत होती
पोनीटेल, रिबिन काळी, पर्ससुद्धा काळीच होती
नाकावरती चष्मा काळा, भाळी टिकली काळीच होती
काळी मूठ, छत्री काळी, कर्णभूषणें काळीच होती
शिताफळाच्या बियासारखी, गळयात माळ काळीच होती
घड्याळाचा पट्टा काळा, डायल सुद्धां काळीच होती
एकच बांगडी कचकड्याची, तीही पण काळीच होती
पर्समधून नोट काढली, तीहीपण काळपट होती
कंडक्टरला तिकीट तेही, 'काळा घोडाच' मागत होती
ओठावरती मात्र तिथे, लालभडक लिपस्टीक होती
सारा भास उदबत्तीचा, धुरासारखी हालचाल होती.

* * *

## कायापालट–

ना तो हा हसला मिशीतहि कधी, पाहू 'महाराष्ट्र' हा ।
कीं ते लक्षण जाण पोरकटही, मानीत आला पहा ।।
नी कीं हा सुतकी करून बसणे, तो हा सदा चेहरा ।
होता दंडक शिष्ट-सम्मत असा, बाहेर वा तो घरा ।। १ ।।
कीं पाहू घडले अचानक असे, आश्चर्य हे तेथही ।
तो ते हास्य दिसे मिशासगट कीं, येई उफाळूनही ।।
सारे दंडक शिष्ट सम्मत खुळे, द्याया झुगारोनिही ।
हासाया शिकवीत की खदखदा, ते एक 'आचार्य' ही ।। २ ।।

* * *

## आपली आवड–

कोणा ' मीलन ' आवडे म्हणत की, गोडी असे खासही ।
कोणा ती ' दगडी ' रुचे कडकही, बोले मझा त्यांतही ।।
कोणाची 'चिकणी'च आवड बघू, रंगेल कीं ती अशी ।
कोणी तो मज 'आवळा' रुचतसे, बोले सुपारी अशी ।।

* * *

## श्रोता–

माना किंवा मानू नका, हरकत काय ? पण ऐकून घ्यायला ।
ऐकल्या शिवाय टीका केली, असा ठपका नको यायला ।।
जगामध्ये हसूं व्हायला, किंचित् कारण पुरे होतं ।
तस कुणाच होऊ नये, अस आपल मला वाटत ।।
हसण्याचाही विनोद होतो, विनोदान हंसू येत ।
तिथेच निर्मळ विनोद होतो, जेव्हा विनोदाचच हंसू होत ।।
अती उत्साही वेधक हसतो, उसना आव बघून हसतो ।
अर्धवट मात्र एकच असा, कारणाशिवाय मधेच हसतो ।।
ऐकू येतं म्हणतात खर, सर्वा शेवटीं मूर्ख हसतो ।
हे माहीत असूनसुद्धां, सरतेशेवटी कोणी हसतोच ।।
पर्यायान तसे सारेच, जगांमधे मूर्ख ठरतात ।
पण त्यांतल्या त्यात कमी त्याला, सारेजण शहाणा म्हणतात ।।
पटल्याशिवाय हसत नाहीं, असा फक्त ' रसिक ' असतो ।
' टीकाकारच ' फक्त असा, पटूनसुद्धां हसत नसतो ।।

* * *

## गर्दी–विशेष–

‘आचार्यांचे’ ग्रंथ वेड ते, कपाटांत ही अफाट गर्दी
घरीं असो वा दारी तेही, अवतीभवतीं सदाच गर्दी
व्यक्ति विशेषहि व्यक्तिमत्वते, पहावयासी करतिल गर्दी
उद्‌घाटन हो वा नाटकही, व्याख्यानासहि अलोट गर्दी
विनोद, कोटया शस्त्र असे कीं, उपहासाची धार जयाला
प्रतिपक्षावर घाव घालिता, हशा नि टाळया प्रचंड गर्दी
कीं रुग्णालयि त्यास हलविले, काय म्हणोनी गर्दीनेही ?
समाचार तो पुसण्यासाठीं, दारावरती प्रचंड गर्दी
रक्तासाठीं आवेदन कीं, रक्तग्रूप दुर्मीळ जरी हो
रक्तदान ते करण्यासाठी, तिथें उसळली एकच गर्दी
रोग विशारद जमले सगळे, सरसावुनि एकेक धावले
काळावरती मात कराया, शिकस्तिचीही केली गर्दी
गर्दीचे परि दर्दी गेले, गर्दीतूनहि गर्दीनेही
दुःखद वार्ता श्रवणीं पडता, तेथ आंसवे करिती गर्दी–

* * *

## तोबा–तोबा–

तारुण्याचा कैफ असा की, गहाण अक्कल मन्मथाघरी ।
कधी पवित्रा विश्वामित्री, ‘ अनाथाश्रमी ’ मुले बिचारी ।।
वाट पंढरी पंढरपूर ते, प्रसिद्ध इथला पाही तोबा ।
क्षमा क्ष ‘मा’ हो तो ‘बा’ याची, विठ्ठल म्हणतो ‘तोबा तोबा’ ।।

* * *

## सांधा–

फुकाफुकी आशा दाखवून, वाट पाहायला लावलीस खरी
लाज मलाच वाटायला हवी, मूर्ख म्हणून हसलास तरी–
कळू दिल नाहीस खर, इतका भित्रा आहेस म्हणून
धुंदीत होते मीच खरी, तुला दोष काय म्हणून–
म्हणतात खरं सोन नसत, चमकणार सारच काहीं
माझीच पारख चुकली खरी, चकाकीचा दोष नाहीं–
बरं झाल, नशीब म्हणत्ये, तुझ तुलाच लवकर कळल
क्षमा मागते मीच तुझी, दोघावरच संकट टळलं–
बोलावलस तर सांगून ठेवत्ये, लग्नाला मी जरूर येईन
तुझ्यासारखी भेकड नाही, झाल गेल विसरून जाईन–
तेव्हा पासून अजून पर्यंत, पत्ता शोधीत फिरते आहे
'माया-बाजार', 'प्रेमनगर' 'निराधम' निवास कोठे आहे ?..

* * *

## अबोला–

धरिलास तू अबोला, की झोपही उडाली।
माझे मला कळेना, कीं चूक काय ? झाली ॥ १ ॥
तोडून वागशी का ? परिचीत रीत नाही।
पदरांत घाल माझ्या, असलीच चूक काही ॥ २ ॥
माझी न मीहि उरले, पाहु नकोस अन्त।
सोडूनि हा ' अबोला ', घेई हातांत हात ॥ ३ ॥

* * *

दौलतीची फूटपट्टी, हळकुंडाचा व्यापार
तारुण्याचा थर्मामीटर, जीवनाची बेपर्वाई
घमेंडीचा दर्प, अहंपणाची बढाई
आकाशाची गवसणी, कल्पनेच्या भराऱ्या
हपापलेले डोळे, सौंदर्याचे मृगजळ
बुभुक्षित नजरा, फसलेले अंदाज
गुढग्याचे बाशिंग, पाळण्याची परवड
परिस्थितीचा सुंभ, भित्री प्रतिष्ठा
प्रपंचाचा पसारा, वाकडी बारव
तारेवरची कसरत, पोटाची खळगी
निब्बर वाढदिवस, ढिगळाची गोधडी
अनुवंशिक रांगोळ्या, रूढीची अफू
कुळधर्माची वेसण, नैवेद्याची लाच
आवळ्याच दान, कोहोळ्याच साकडं
खुडलेल्या कळ्या, चुरगळलेल्या पाकळ्या
संगमरवरी स्वप्न, भंगलेल्या मूर्ति
उठलेल बस्तान, पिंडावरची श्रद्धा
गुंतवलेल्या आशा, पांगळी आश्वासन
समाधानी निःश्वास, विश्वासाचे कावळे
आवळे जावळे स्वभाव, न मिळणारी औषधी
जीवनाचा बुडबुडा, 'नवावरचे शून्य' !!

* * *

‘ कान ’ गोष्ट–

कीं ललनांची प्रकृतीच ही
जगजाहिर ती असे गोष्ट ही ।
षट्कर्णी कीं करतिल पाही
जरी असे ती कान–गोष्ट ही ॥ १ ॥

नवीन फॅशन नवा दागिना
‘ रिंग्ज् ’ कराव्या म्हणे दिसत ती ।
स्मित हलकेसे नजर मिळविता
म्हणे ‘इकडची’ हवी सम्मती ॥ २ ॥

तुला हौस तर बनवुनि घेई
कुडचा मोडुनी ‘ रिंग्ज् ’ कशाही ।
जरी तुला ना खंत उरी पै
मजला म्हणतिल ‘रिंग-माष्टरही’ ॥ ३ ॥

* * *

डंख–

तो रंग सावळाही, कीं साखळे मनांत ।
नजरेतले विषारी, कीं नाग डंखतात ॥
हा खेळ जीव घेणा, जाणोनि खेळशी का ।
मी जाणले परन्तू, तू जाणशील ते का ? ॥

* * *



आलु बोखार

## काव्य गायन–

ऐका कथा अशी की, ती काव्य गायनाची ।
रसिका ! क्षमा असावी, कीं स्पष्ट बोलण्याची ।। १ ।।
ना तथ्य फारसेही, अंदाज एक वेडा ।
कीं श्रोतृवृंद तो हा, जवळून पाहु थोडा ।। २ ।।
अर्धा अधीक की ज्या, काव्यात राम नाही ।
उरला तयातुनी त्या, आराम ना घरीही ।। ३ ।।
चाळून त्यात उरला, परटी घडीतलाही ।
राखून ठेविलेल्या, जागेस जागलाही ।। ४ ।।
त्यातून शेष जो हा, ना काम त्यास कांहीं ।
द्या 'दाद' वा न द्या ती, गातील कीं कवीही ।। ५ ।।

* * *

## चारोळ्या–

तनु गौरांगी, घट्ट अशी ती ।
गाली फुलल्या, मुरुम पुटकुळ्या ।।
दिसत जणू कीं, बासुंदीवर ।
तिथे विखुरल्या, त्या चारोळ्या ।।
भाग्यवंत तो, चाखिल कोणी ।
प्रथम दर्शनी, बसता मर्जी ।।
आणि अभागी. शपथेवरती ।
गोडाची, मज म्हणे अलर्जी ।।

* * *

**धक्का–**

येई घेउनि कागदांतुनि कुणी, पानें विडचाची अशी ।
जर्दा आणिक काथ साथहि तसा, तो ती सुपारी तशी ॥
पाना लावि चुना नि सोडित पुडचा, धक्का बसे त्याजला ।
तो त्या पाहुनि आपुल्याच कविता, कीं बोलला च्यायला॥१॥

मी ना खंत धरी तुम्हीहि न धरा, कीं सांगतो सत्यही ।
सद्दी संपुनि होत तेथहि जमा, साहित्य रद्दीतही ॥
'गाद्या' दोनच फक्त त्या रसिक हो ! काव्यास लोळावया ।
'पानाची' अशि एक आणिक दुजी, 'रद्दीच'गादी तया ॥२॥

* * *

**स्वप्नरंजन–**

झाली फक्त दृष्टादृष्ट, लागे जिवा हुरहूर ।
दाटल्या त्या काचोळीला, साक्षवक्षाची काहूर ॥
बैसवोनि नेता घरीं, डोळचांच्या त्या पालखीत ।
पापण्यांच्या चौऱ्या ढाळी, तयावरी सदोदित ॥
पारा नजर ओघळे, ह्याचि देही ध्यास खुळा ।
करी कहाली जिवाची, आसावतो जीव भोळा ॥
साहोनी हा कोंडमारा, टाकी अशी भिजवून ।
आणि स्वप्न जागवीते, त्याच वक्षीं विसावून ॥

* * *



आलु बोखार

छंद–

ओळख पटली, मला तुझीही, तशीच माझी तुला
सखे ! मग, ध्यास तुझा लागला–

मस्त सावळी, काया पाहुनि, रसरसलेली अशी
चुंबनी, प्रथम पाडिशी फशी–

सुरू जाहल्या, गांठीभेंटी, चोरूनि त्याही कशा
आजही, स्मरत जशाच्या तशा–

अनुभव तो हा, मस्त निराळा, मैत्रीतुनि लाभला
आठवे, दिन मीलन आपुला–

करे फिरवुनी, सोडित नाडी, वस्त्र फेडि फरफरा
प्रमोदे, उचलुनि घेई करा–

मस्त रगडिता, सीत्कारत , तूं सुधामीलनांतरी
फुलुनि ये, क्षणांत तू सत्वरी–

कडकपणाची, लज्जत न्यारी, स्मरत अहा !! घडिघडी
वाटली, चाखावी हरघडी–

घर्मबिन्दु हे, मुखी झिरपले, क्षण तोही भासला
तुझ्यासह, अधांतरी ने मला–

उगाच संशय, घेऊनि म्हणती, भुरळ घालुनी मला
तूच की, मज नादी लाविला–

आपापसामधि, चुगल्या करिती, म्हणति बिघडला असा
जगाचे, तोंड धरू मी कसा ?–

अर्धांगी ही, पिता तसा हा, माताही कोपली
बहीणहि, टाकुनि कीं बोलली–

हा छंद, कुणी अन् तुला लाविला कसा
तू कुळा, काळिमा, असा लाविशी कसा
ती लाज, सर्वही, पिशी कोळुनी कसा

मुकाट ऐकुनि, घेता येई, कींव जगाची मला
पराचा, करिताही कावळा–

तोंड जगाचे, गप्प कराया, उपाय सुचला मला
सखे मी, क्षणींच अवलंबिला–

अहो ! न कोणी नार 'तमाखू', धिकारुनि बोललो
जगावर, तुझ्या सवे थुंकलो.

* * *

**कविता–**

नेत्रांत ही कुणाच्या, अधरीं दिसे जशी ही ।
ह्यास्यातुनीहि वा ती, फुलता दिसे तशी ही ।।

राहील वा लपोनी, गुंतून कुंतलात ।।
दबल्या मुखातुनी ये, गालातल्या खळींत ।।

कीं ही जित्या जिवाची, कविताच काव्य कीं ते ।
शब्दांत ना असे जे, पकडावयास येते ।।

मिळतात नेत्र जेव्हा, कीं त्या क्षणीं तिथेही ।
उरते न तेथ काही, सांगावयास ते ही ।।

* * *

**आदर्श–**

ऐका ! ते गुरुजीहि सांगत मुला, ठेवाहि आदर्श तो ।
वंदावीत हि पाउले म्हणत कीं, बोले तसा चालतो ।।
ऐकोनी वच तेथ एक मुलगा, बोले गुरुजीस हा ।
म्हणजे वंदन योग्य फक्त ठरतो, 'रिक्रूट' पोलीस हा ।। १ ।।

ऐकोनी गुरूजी पहा भडकले, नी जात ते धावुनी ।
बोले थांब ! नि दांत खाउनि असा, रट्टा दिला ठेवुनी ।।
रट्टा खाउनि बोलला पुनरपी, कीं धन्य आम्ही मुले ।
बोले तैशिच चालताहि दिसली, साक्षात्दुजी पाउले ।। २ ।।

* * *

## स्वातंत्र्य वीराचा 'आत्मयज्ञ'–

'वासुदेव' नी 'चाफेकर'ही, ठेवुनि गेले शिलगावुनि जे ।
धगधगतेही ठेविन म्हणतो, कुलस्वामिनी यज्ञ-कुंड ते ।।

तप्त कांच ही धरील हाती, वा रक्तानें करी स्वाक्षरी ।
सशस्त्र क्रान्ती सत्व परीक्षा, संघटनाही गुप्त उभारी ।।

स्वातंत्र्याप्रत सशस्त्र क्रान्ती, मार्ग म्हणे हा एकच केवळ ।
तमा न धरिली परिणामाची. परिणामी जी ठरली उज्वल ।।

शिरहि जरी हो! धडा वेगळे, उतरविल्या त्या कृतीत शपथा ।
हासत जाती फासा वरती, करि धरूनीही 'भगवद्गीता' ।।

इतिहासाची साक्ष ठेवुनी, वदे न व्रत घे अंधपणाने ।
दाहक खासहि दिव्य परन्तू, बुद्ध्या करि धरूं वाण सतीचे ।

शब्दालाही धार अशी ती, की तलवारहि फिकी पडावी ।
संघटनेतुनि फुलवी ठिणगी, तत्वनिष्ठ ती कृती घडावी ।।

तिखट तशी ती पहा लेखणी, क्षणिं ओकिल ती अंगारहि तो ।
कसा न जळला लिहिला कागद ? भ्रांतचित्त हो बघणारा तो ।।

साहस कीं ते अजब जगी हो, सागरांत जी उडी ठोकली ।
नक्षा उतरवि पहा भल्यांचा, त्रिखंडांत ती 'उडी' गाजली ।।

सजा भोगिता कठोर ऐशा' परतवुनी यमदूत लाविले ।
हो बेडी संदेश वाहिनी, कारागृह ते पहा हलविले ।।

तुरुंगात ये भेटायासी, धर्मपत्नि ती त्या वीरासी ।
तं हृदयातिल आग गिळोनी, हसता हसता बोले तिजशी ।।

चिमण्या त्याही तसे कावळे, चार काटक्या करूनी गोळा ।
बांधुनि घरटीं वीण वाढवी, हाच सांग का ? प्रपंच सगळा ! ॥

असा न हा संसार आपुला, स्वार्था वरती ठेऊ निरवारा ।
जळेल ज्यातुनि पारतंत्र्यही, स्वातंत्र्याचा ध्यास निवारा ॥

फोडूनि घरची चूल बोळकी, उभवित जे संसार पराचा ।
दिसेल निघता त्यांतूनचिही, धूर धूरही तो सोन्याचा ॥

घण ऐरणही जाई पिचुनी, तरी अभंगहि हिरा परन्तू ।
त्या पैलूंची चमक आगळी, असामान्यही नुरेल किन्तू ॥

कवी न केवळ महाकवीहा, जगलाही ना लिहिले पोकळ ।
ती प्रतिभा ना उसनि शिदोरी, ना शब्दांची वळवळ केवळ ॥

शक्तिहीन तो जरी जाहला, बुद्धि भ्रंश ना परी कदापी ।
कारण नव्हता स्वार्थ तिथेही, तळमळ पोटी देशहिताची ॥

सरडचा परि ना रंग बदलले, तत्वनिष्ठ हा अढळ धृवासम ।
स्वतंत्र भारत अखंड तोही, प्रथम पासुनी सांगे गर्जुन ॥

अनादि मी हा अनन्त तैसा, अवध्य होई असे बोलला ।
असा कोण ? तो रिपु जगती हा, जो मज मारिल सांग! जन्मला? ॥

सार्थ करी तो शब्द असे ते, देह ठेविता वीर शिरोमणि ।
त्र्यांशी वरुषे जगुनि पावला, अमरत्वहि प्रायोपवेशनी ॥

* * *

**नंगेसे–**

केले अर्ज कितीक उत्तर नसे, आले परी एकदां।
पाही फोडुनि तो उताविळ असा, आला लिफाफा तदा ।।
सर्कारी तशि त्यातही मिळतसे, कीं नोकरी च्यायला ? ।
हर्षोत्फुल्ल वदेहि मारित उडी, तो भोंवती नाचला ।। १ ।।

त्या धाडून दिलेहि ' मेडिकलला ' देऊनि आज्ञा करी ।
निर्देशीत स्थळीं उपस्थित असा, तो राहि वेळेवरी ।।
ना आले अजुनीहि डॉक्टर वदे, तो त्या शिपाई गडी ।
लावा नंबर पेटि मागत म्हणे, शिल्गाविण्याही विडी ।। २ ।।

येता डॉक्टर ती विडी विझविता, आज्ञा सुटे तेथही ।
खोली दावुनि व्हा दिगंबर म्हणे, तेथे तुम्ही सर्वही ।।
ते हे 'क्षेत्र' गमे जसे मग जणू, 'सिहस्थ' तो ही तदा ।
नंगेसे समझा बराबर वही, क्यों ही 'डरे' वो खुदा ।। ३ ।।

लाजोनी मग हासतात बघुनी, कीं एकमेकाकडे ।
कोणी खासचि ' ते ' हसू लपविण्या, पाहील आढ्याकडे ।।
भिंती सन्मुख होउनी बघ कोणी, पाहील तक्ते उगा ।
काणा आणिक तो करूनिहि बघे, डोळा कुणी हा बघा ।।४।।

कोणी नंगट हो सदा करितसे, गोष्टीहि नंग्या जरी ।
पं नंगा करिताच त्यासहि कळे, नंगाहि इंगा परी ।।
शिक्का मोर्तब होउनी ग्रहण ते, सारे सुटे पाहता ।
नंगेसेभि यहा न डॉक्टर डरे अच्रज्करे वो खुदा :। ५ ।।

* * *

## लव् (ह) मॅरेज

विचारूं नये विचारतो परि
काय होय 'लव्' मॅरेज तुमचे ?
ऐकुनि खंवचट प्रश्न अवास्तव
देत हसुनिही उत्तर त्याचे–
**म्हणे तिचे हो ' ना माझे परि '**
म्हणाल जरि हा गूढ मामला
उकल तयाची करावयासी
कानांमध्ये कीं कुजबुजला–
सक्त 'खाजगी' गोष्ट असे जरि
फक्त तुम्हाला म्हणुनि सांगतो
धरा न शंका की 'लव' मात्रहि
नखशिखांत लव मम अंगावर !

***

## निसरडे–

का ? सदा असे हे होते
ना कोणी हृदयीं ठरते
घेताहि तपासायासी
ये हासू माझे मजशीं
कीं कर्मठतेचे पाणी
तुंबले ! न वाहत वरूनी
सांचले दिसे शेवाळे
हृदयांत निसरडे झाले !

***

...अ–२

## सांग कसे हसलो ? –

(कै. गोविंदाग्रजांची क्षमा मागून)

रस्त्यामाजी भेट प्रथम ही
नव्हता परिचय, हसलो तरिही
वळून बघता, पुन्हा तिथेही
सांग कसे हसलो !

दिवस यापरी जाता काही
उरलो आपण ना आपणही
झेलु लागता शब्द शब्द ही
सांग कसे हसलो ?

यापरि गेले महिने काही
मूहूर्त ठरला लग्नाचाही
गळचांत माळा त्या पडताही
सांग कसे हसलो ?–

उलटले न त्या वर्ष पुरेही
हिशेब सारा, ओठावरही
सुटता पाहुनि 'अंक'गणितही
सांग कसे हसलो ?

* * *

तिस्तम्जा–

पश्चिम वाटा सुसाटला
हलका हलला
गलका झाला
झोंपाळी लय अडखळली
'विचार' धारा विंचरली
जीवन कक्षा हिरवळली
क्षितिज उजळले
नयन हासले
झगमग बघता की वदले
तिस्तम्जा ही तिस्तम्जा ॥ १ ॥
जातपात ही विर्घळली
छाती फुगली
गर्दन झुकली
क्षणांत जीवन भर्कटले
बघता बघता खेंचरले
धजे कोण हे पुसण्याला ?
तुम्ही कुणाला !
कुणी तुम्हाला !
अवघडला क्षण तरि वदला
तिस्तम्जा ही तिस्तम्जा ॥ २ ॥
तुळस तिथे ती शहारली
कुंडी फुटली
नवी गवसली
की 'माळयाने' सावरले

खतपाणी ते मानवले
तिचे तिलाही जाणवले
दिसे डवरली
फुलता दिसली
वच अवकाशी लय घुमली
तिस्तम्जा ही तिस्तमजा ॥ ३ ॥
क्षणांत तारू भकंटले
वारा प्याले
भान हरपले
दिशा उमगती ना त्याला
अवसर ना त्या लाटेला
हिंदळवीही वाटेला
धमनी उडते
हृदया कळते
डचमळते मन तरि म्हणते
तिस्तम्जाही तिस्तम्जा ॥ ४ ॥
जरी पिसारे उभारती
मोर नाचती
अवती भवती
पश्चिम दृष्टी उरी रुजे
गंगा-जमनी रूप सजे
दर्पणास कीं अर्पण जे
परी न बुझते
नेत्र मिचकते
दिमाख बेगड वरि म्हणते
तिस्तम्जा ही तिस्तम्जा ॥ ५ ॥

* * *

## रास-क्रीडा-

रंगत गोष्टी राशी वरूनी, व्यथा सांगती राशिस स्मरूनी
' मेष ' पात्र संकेत लोकरी, भरे हुडहुडी ऐकुनी उरी

'मिथुने'ची तक्रार सर्वदा, वराहसुद्धां हसे खदखदा
कर्क रोग जणु ' कर्क ' राशिला, चाल वाकडी शिक्का बसला

लपवित 'सिंह'ही व्यथा अशी ती, निष्प्रभ कीं हो मादी पुढती
'कन्या' म्हणता अठया कपाळी, विधि-लिखितचि कीं दिसते भाळीं

लोह इथे वा सुवर्ण तोला, अस्थिर जीवन खंत ' तुळेला '
'वृश्चिक' वदते सुटे न कोडे, नशिबी दिसती सदाच जोडे

अक्षय भाता म्हणे वाजतो, ' धनु'र्धारि हा शिकार बनतो
संक्रांतचि ये सदा आम्हावर, 'मकर' बोलते फुटते खापर

आता कुठची सिंह कटी ती, खंत धरी कीं 'कुंभ' उरी ती
धुवाल मजसी जरी कितीही, वास न जाइल म्हणे 'मीन' ही

खंथ जूं हे मानेवरती, एक मुखानें ' वृषभ ' बोलती
कदर करीना परी कुणीही, की आम्ही बहुसंख्य असोनी

म्हणे ऐकुनी क्षमस्व कोणी, डोळा मारित वदे तक्षणीं
नजर चुकीनें कदर न झाली, शिरगणती ना कधींच केली.

ना चुकता कीं इथुन पुढेही, करु साजरा सण 'पोळा ' ही-

* * *

मिठाची जाग–

तुझ ते माझं, आणि माझ ते माझ्या बापाच
हेच असत घोष वाक्य ‘ सत्तेच्या अभिलाषेच ’
मारणाराचा धरता येतो हात, पण धरता येत नाही तोंड
बोलणाराच–
चाललेल्या बडबडीतून, भासवीत असत जे जगाला आपला
साळसूदपणा
म्हणतात ज्याला ‘ चोरांच्या उलटचा ।
लगाम असतो हातात मोतद्दाराच्या, जेव्हां बसवतात घोड्यावर
रडतराऊला
तेव्हा, केंद्रित असत लक्ष रडतराऊच मोतद्दारावरच,
पुढील वाटचालीसाठी
आणि मग पडते कोलमडून आणलेली उसनी ऐट, पहाताना
अडलेल घोड, नेमक्या ठिकाणी
घ्यावाच लागतो समाचार– लादल्या जाणाऱ्या गोष्टीचा
आणि– व्हाव लागत सिद्ध, खांदा द्यायला
जरी नांदत असलो सुखात, खांद्याला खांदा लावून
मग पुरे पडतात आसू रक्ताचें – हासू व्हायला जगाच्या बाजारात
नाहक बळी पडलेल्या त्या निरपराध जीवासाठी
जेव्हां
जेव्हा होते परिसीमा, सीमा ओलांडताना, माणुसकीची
रक्ताचा गट जरी एक असला, तरी प्रकृती असते भिन्न,
म्हणूनच
जागे रहाते इमान, मान गेली तरी आणि दाखवून देत साऱ्या जगाला
जाज्वल्य देशाभिमान – खाल्ल्या मिठाची जाग म्हणून
प्रकृतीवर होतो परिणाम वातावरणाचा, म्हणूनच
असल पाहिजे ‘ जागृत ’, सदैव ‘ आत्मरक्षणासाठी ’

* * *



आलु बोखार

## पश्चात्ताप -

म्हशीस मेल्या दूध फार ते, असेच कोणी होउनि जाती ।
अनुयायी ते फंड उभारूनि, 'कर्तृत्वाचे' स्मारक करिती ॥१॥

स्वार्थ परायण तत्व शून्यता, दिसते पोळी भाजुनि घेती ।
आणि घरावर हलवायाच्या, तुळशीपत्रहि ठेवुनि देती ॥ २ ॥

जितेपणीं हे पाय ओढिती, उत्कर्षाचे पथ्य जयाला ।
उच्चस्थान दे मरणोत्तर परि, 'निर्जिव' ऐशा त्या पुतळ्याला ॥३॥

टाकारी हा कुणी घडवितो, गालबोट कीं शिल्पकलेला ।
सुक्याबरोबर जळेल ओले, दोषच ये त्या मरणाराला ॥ ४ ॥

व्हावयास जी कधी न धजली, पाठीमागे जितेपणी ही ।
अशी शेलकी टीका ती ही, ऐकू येतहि तोंडावरही ॥ ५ ॥

ससे होलपट पाहुनि वदला, मनी मृतात्मा खिन्न असा तो ।
टळली असती 'विटंबना' ही, मुळात जरि मी मेलो नसतो ॥६॥

* * *

## आम्ही कोण ?

(कै. केशवसुत व कै. प्र. के अत्रे ह्यांची क्षमा मागून)

आम्ही कोण ? म्हणोनि काय पुसता, ते नाक फेंदारूनी ।
'टेरी'लीनहि पॅन्ट फिट्टहि तशी, शर्टासवे आमुच्या ॥
तो 'ट्रान्झिस्टर' हाति काय न दिसे ? जाता पथीं आमुच्या ।
अस्ताव्यस्त समस्त कुंतल शिरीं, घ्या नीट ते पाहुनी ॥ १ ॥

त्या आम्हा जन रोडसाइड असे, कीं 'रोमिओ' बोलती ।
नाही का? ललना पथी विखुरल्या, आम्हासि पाहावया ॥
बुच्त्कारातुनि शब्द टॉपहि वदू, कीं लक्ष वेधावया ।
' बोलू ' आणि वटारताहि विचकू, दाताड जे नेत्र ती ॥ २ ॥

ध्येयीं 'शून्य' असे जरी भटकतो, आम्ही सुरांच्या सवे ।
स्वर्गाची समता धरेसि नच का ? हो आणितो ती बरे ! ॥
ते आम्हीच असे कृती मधुनिया, ज्यांच्या सदा पाझरे ।
ते आम्हीच वदूहि शब्द ' असली ' , जे ना तुम्हा बोलवे ॥ ३ ॥

आम्हाला वगळा-नि निश्चळ पहा होतील रस्ते झणीं ।
आम्हाला वगळा-मचूळहि पहा, हो जीवन तत्क्षणीं ॥

* * *



आलु बोखार

उरला नाही भरवसा, भरवशाचाच भरवशावर
धरते आहे कास असत्यच, सत्यतेन असत्याची

देते आहे दोष दुर्दैवच, आपल्याच दुर्दैवाला
उरला नाही पोषाखी डौल, पोषाखाला सुद्धा

लज्जा सुद्धा झाली आहे मर्दानी, अंधानुकरणान
भूषण झाला आहे जनानी पणा– मर्दानीला

गंधाला देखील उरला ना गंध, अस्सल पणाचा
जिथ अस्सलच चालल आहे कृत्रीम होत

तिथ कृत्रीमपणा अस्सल कसा नसेल ?
कापताहेत गळा, केसच केसान केसाचा

बनावट बत्तिशी हसते आहे कृत्रीम नेत्राला
उजेडच चाचपडतो आहे अंधारात उजेडासाठीं

पांढऱ्याचे होतात काळे, लपवताना उसना दिमाख, पण–
गय करीत नाही सुरकुती, चुगली करताना चेहेऱ्यावरली

पारखी झाली आहे माणुसकीच– माणुसकीला आणि
येऊ लागली आहे कींव, किवेचीच किवेला–

* * *

## नवरस मंजरी–

**शृंगाररस**—(कै. आचार्य प्र. के. अत्रे यांची क्षमा मागून)

भाळी लावित लाल कुंकुम चिरी
तो तंग चोळी उरी ।
वाक्या शोभीव ते भुजद्वय तिचे
ती कृष्ण काया जरी ॥
नाकी नीटस आणि रेखिव अशी
पाहून घाटीण ती ।
तेथे तो बघ प्रेमवीरहि कुणी
मारीत 'लाईन' ती ॥ १ ॥

घाली शीळ अशी बघोनि तिजला
गाली हसे तो सदा ।
त्याचा तो बघुनीहि लोचटपणा
वैतागली एकदा ॥
क्रोधे घट्ट धरूनि मन्गट वदे
रे ! सोडविशी जरी ।
मी होईन तुझीच बाइल 'मढ्या'
ना बोल आई तरी ! ॥ २ ॥

झाला गर्भगळीत घाम फुटला
त्या प्रेमवीरासही ।
ना हो धीरहि द्यावयासहि तिच्या
डोळाहि डोळ्यासही ॥
बोले जाइ निघोनि नीट 'मुडद्या' !
तो हात झाडोनिही ।
सोडी आज, परी पुन्हा गवसशी,
मोडीन पेकाडही ॥ ३ ॥

* * *



आलु बोखार

'वीर' रस–

परसामाजी ऐकुनि खुडबुड
दचकुनि दोघे उठून बसली

कानोसा मग हळूच घेउनि
कुजबुज चाले भेदरलेली–

बघून या कि म्हणता त्याला
अधिकच दिसला तो घाबरला

सोबत चल की म्हणे बघूया
तयार ना परि पुढे व्हायला–

पुसोनि मुखिचे धर्म–बिन्दु ते
धीटपणाने वदे शब्द कीं

नव्हते ठाउक असशिल इतुकी
'भित्रि' न की ये सोबत सुद्धा–

* * *

वंदे सेवक चित्रकार हे
जरी उपासक सौंदर्याचे
हिडीस करि परि रूप तयाचे
का नच 'अद्‌भुत' हे ?-

पुराण वस्तू संग्रह गृहीं
अती पुराणी वस्तू पाहुनी
'अडगळ' म्हणुनी देत फेकुनी
का नच 'अद्‌भुत' हें ? -

सांगोवांगी ऐकुनि कांहीं
नाक खुपसतो नको तिथेही
आणिक बोले 'तज्ञा समही
का नच 'अद्‌भुत' हें ? -

दिसे हाडाचा सांगाडा हा
हाड हाड ते घ्या मोजुनिही
परी जिभेला हाड नसेही
का नच 'अद्‌भुत' हे ?-

'हॉर्ट लेस ही' म्हणती ज्याला
मिरवित प्रौढी जगता दिसला
'हार्टअॅट'क चि येता खपला
का नच 'अद्‌भुत' हे ?-

मंगल कार्यालया नांव कीं
बघू 'विवेकानंद' तसे ही

‘ मारुती ’ मॅर्टानिटी होमही
का नच ‘ अद्भुत ’ हे ? –

बॉटम आणिक टॉपलेसही
ब्लाउज बटणें पाठीवरही

लावुनी देता लाजे पतिही
का नच ‘ अद्भुत ’ हे ? –

अय्या ! आणिक इश्य ऽऽ !! लोपले
नसे स्त्रैण्यही वा शब्दाला

मुलीहि म्हणती बघा ‘ च्यायला ’
का नच ‘ अद्भुत ’ हे ?

* * *

**'बीबत्स' रस—**

विषय निराळें कलाकृतीचे
बघू प्रदर्शन चित्रकलेचे
आणि पाहता खिळे नजरही
चित्र दिगंबर त्यातुनि ' स्त्री ' ही

प्रमाण बद्धहि अप्रतीम ती
मोहक विरळा अशी आकृती
सूचिपत्र ते बघता वदला
हजार रुपये किंमत याला ?

इतुके पैसे खर्चुनि तेही
हाती काय तर ' फक्त ' चित्रही ! !
खोल मनांतिल ' श्वान 'वृत्तिची
पकड दर्शवी ' रस बीबत्सचि '

* * *

आलु बोखार

## माध्यम– (आमच्या आम्ही)

सांगून गेलेंत आमचे ‘ हे ’ म्हणे मुलाचा अभ्यास घे
मुलगा मुळीच ऐकणार नाही, एका जागी बसणार नाही
सदाच, त्याची टाळाटाळ, अभ्यास काय घेणार ? कपाळ !
ह्यातून दुष्काळांत तेरावा महिना, कॉन्व्हेंट शिवाय शाळाच
मिळाली नाहीं ह्यांना ! !

भरीस भर हिंदीचा झक्कू, हमकू ना येई बोलणेकू, ना शिकवणेकू
माध्यम इंग्रजी पडलं अस, कीं कळेना इंग्रजीत रागवायच कसं ?
तरी मनाचा धडा केला, आणि मारली हांक अभ्यासाला
बंडू ! ‘ टेक युवर बुक्स ॲन्ड सिट हिअर, डोन्ट गो
हिअर अँन्ड देअर :

मेल्या सांग ! किती छळणार आहेस तरी,
थांब ह्यांनाच सांगते, येऊ देत घरीं
काय ? ऐकू येतय ना ? बंडू ! ! ‘ कम्हिअर म्हणते ना ! ’

* * *

'रौद्र' रस–

केले चित्र प्रदर्शनासहि असे
धाडावया त्यातुनी
तो त्याते कळताहि ना निवडले
संतापला ऐकुनी
बोले ना धरण्यास येतहि जया
तो कुंचलाही करी
साले ! चोर !! इथे परीक्षक पहा
सारीच झब्बूगिरी –
कोणी कुत्सित तेधवा पुसतसे
म्या ते असे ऐकिले
की होता कमिटीत काय? म्हणुनी
ना चित्र ते धाडिले!
ऐकोनी वच 'कुंचलेश्वर' असा
'रौद्रस्वरूपा' धरी
डोळे फाडुनि इंग्रजीतहि पहा
गालीप्रदाना करी –

* * *



आलु बोखार

'करुण' रस–

कुणी झाला बघ पास असा तो हा
मिळत ' डिप्लोमा ' चित्रकलेचा हा
म्हणे आता मी जाहलो चित्रकार
काय? ' रविवर्मा ' मजपुढे असे थोर
करिल कॅमेरा काम जे असेही
कला कोठे करण्यात ते तसेही !
येरु बोले मी करिन असे ते को
फिका पाडिन' 'रॅम्ब्रंड ' 'पिकासो' ही
कुणा म्हणतो की, मांडणी जमेना
दुजाची ही रंगात होय दैना
कला व्यापारी जाणि ना कुणी एक
अशा यादीतहि आणखी कितीक
जिथे पिकते ना विकत ते तिथेही
वदे जाईन ' इग्लंड ' ' फ्रास ' लाही
योग आला ना कधिच तो असाही
येरु झाला हतबुद्ध अन्ति तोही
सरळ पेशा मग धरी शिक्षकाचा
आणि होई तो विषय कुचेष्टेचा
टळत परि ना आत्मप्रौढी तयाची
येत करुणा ही ऐकुनी तयाची
पाप हे शतजन्माचे, कीं दैवे खेळ मांडिला
दैवाचा सूड घ्यायासी, चित्र-संन्यास घेतला
झाकोनी नेत्र ते देवा! काय हो बसला तरी
कलेचा ऱ्हास हा ऐसा, काय? ना जाणवेतरी !

...अ–३

* * *

'वत्सल' रस–

खिसे चाचपुनि देत असाही
मोजुनि कपडे ते धोब्यासहि
चिरंजीवाच्या खिशांत ती ही
मिळे पित्याला, ' सिगारेट'ही

हाके सरसे, चिरंजीव ते
पित्या समोरी उभे ठाकले
मागुनि मातायेता दिसली
काम टाकुनीहात मधले

चमकु नको वा लाजु नकोही
मान्य जमाना आज बदलला
साध्या गोष्टींसाठी परि ही
लपवा छपवी हवी कशाला

संदर्भाचा होन उलगडा
प्रश्न चिन्ह हे चेहे-यावरती
तोच पिता दे चिरंजिवाच्या
एक ' बिडीचें ' बंडल हाती

तुला जरी नातुझी काळजी
हवी परन्तू मला घ्यायला
सिगारेट ना बरी परंतू
' बिडी ' बरी ही तब्येतीला

रक्त दाट हे पाण्याहुनि ते
चिरंजी ते मनी समजले
जालिम जरि हा जमाल गोटा
' रसवत्सल ' परि मिश्रण गमले–

* * *

आलु बोखार

## 'शान्त' रस–

कोणी हा पुतळा जसा मदन तो, की काय वाटे तया ।
इच्छी सुंदर कोवळीच चवळी, जै शेंग ऐशी प्रिया ।।
रंभाही समजे स्वतःसहि कुणी, आणीक पाही अशी ।
इच्छी ही पुतळा जसा मदनही, तो हा सखा ती अशी ।।

झाले ठीक परंतु ते इथवरी, इच्छा न ती वावुगी ।
पिच्छा मात्र असा कुणी धरितही, तेथे तयाचा उगी ।।

सारा मोहर तो असा करपुनी, जाता दिसे तेथही ।
आणी होउनि राहि मात्र सगळी, ' काष्ठौषधी ' तेंथही ।।
ज्याचा सूर जसा गमे मग तया, ती साथ लाभे तशी ।
आणी जे पडते पवित्र पदरीं, मानूनि घेती अशी ।।

तो हा ' काष्ठतरंग ' तेथ गतही, ती रंगताही दिसे ।
जी कीं 'शांत' रसा भिचिंतित अशी, ती खासही होतसे ।।

पाही तू रसिका ! जगीं चहुकडे, ऐसे जरी चित्रही ।
'जादा' मात्र स्वतःस जे समजती, ना औषधी त्यासही ।।

***

'हास्य' रस –

स्पर्धा चित्रकला अशी लढविती, आवर्जुनी खास ते ।
होते त्यात महारथी अतिरथी, एकाहुनी एक ते ।।
शेखी स्पर्धक तेथही मिरविती, कीं आपुली लीलया ।
कीं ते बक्षिस खास जिंकित म्हणे, खात्री जयाची तया ।। १ ।।

चित्रासी भलत्याच बक्षिस मिळे, पै फार वाखाणिले ।
फोटो आणि समीक्षणे झळकती, भारीच ते गाजलें ।।
झाला ना बध चित्रकारहि असा, ना देखिला कुंचला ।
त्याचा तोहि ठरेचि भूषण खरा, देशासवे ही कुला ।। २ ।।

घेता बक्षिस चित्रकार हसला, टाळी पडे तेथ ती ।
झाले स्तब्ध महारथी अतिरथी, शून्यांत ते पाहती ।।

जेता पै वदता सभागृहि उठे, कीं हास्य कल्लोळही ।
कोडे ना सुटले कशास उलटे, ते टांगले चित्रही ! ।। ३ ।।

* * *

## ' वतन-जतन-आणि पतन '

(कै. गोविंदाग्रज आणि श्री अनंत काणेकर यांची क्षमा मागून)

कुठल्याशा जागीं देख, बिल्डींग नेटकी एक-दिसतसे
संसार दोन खोल्यांचा, कीं दिसे नवाही त्याचा-त्या तिथे
लग्नाचे सार्थक झाले, आलें घरी पाउल इवले-'पोरगी'

त्याक्षणीं
विरमला मनीं,
बोलतो झणीं,

कशी कडमडली-घासातच पहिल्या साली-मक्षिका--
होता जरि सावध केला, घोटाळा त्यातचि झाला-तो पुन्हा
कीं ठसा मुखावर दिसला,जणु घाव जिव्हारी बसला भीतिचा
वेड पुरे लागे त्यांना, अंदाज रोज करताना-की खुळा

घेउनी
येत हा कुणी
निरोपहि झणीं

बातमी दिधली-' मुलगीच ' पुन्हा ती झाली-सांगतो.—
यापरीहि खेपा पांच, संपतो तरी ना जाच-तो तिचा
सांगता हिताची गोष्ट, ना पटे परीं तो रूष्ट-होतसे
तो हसूनिही उपहासे, निक्षून सांगतो खासे-त्याक्षणीं
तो दिवा हवा वंशाला, ना तरी अर्थ हा उरला-जीवनी—

आशाहि,
टांगति राहि,
तिथे ती पाहि,

नसे त्या खंत, पाहील किती हा अन्त—नाकळे—
निर्धार पाहूनीं त्याचा, सर्वांची खुटली वाचा—ती तिथे
तो विषय होय चर्चेचा, दिसतही एक थट्टेचा—कीं असा
इतरांच्या अर्धांग्याही, ना धजतिल देता ग्वाही– 'तिकडची'
भरवसा काय? पुरुषांचा, म्हणतकीं प्रश्न मर्जीचा–लाजुनी

निसटले,

त्यातुनी भले,

दिसे उमगले,

बोलती ललना, ना संभव पुनरपि ज्यांना–तो कधीं—
थबकला ऐकुनी तोही, चाहूल लागला त्याही–थबकल्या
चमकला ऐकुनी त्यांचा, संवाद मायलेकींचा–तो असा
बे माप मुले व्हायासी, ना लागत अक्कल त्यासी–कवडिची
अमक्यांची 'पोल्ट्री' म्हणुनी, हिणविती बोट दावोनी–लोक ते
ना इलाज माझा बाई, सांगते मुलीसी आई – उकलुनी
गर्भीत अर्थ की त्याचा, वंशदीप लावायाचा तो असे
सांगते आणखी काहीं, पाणावत डोळे तेही–सारखे

संयोग,

फक्त उपभोग,

असा हटयोग,

स्फुंदता वदली, अंधार दिव्यांच्या खाली हा असा—
परि पुन्हा घेऊनी तिजसी, सूतिकागृही जाण्याची, तो निघे

लावितांहि कुंकुम भाळीं, तो तिचा हुंदका जाळी—हृदय ते.
डबडबत्या नयनी दिसला, अधरिचा शब्द अडखळला–तो तिचा

ती शर्थ,

ठरे ही व्यर्थ,

तिथे ती मूर्त,

भंगता दिसली, ‘बाळासह् सोडुनि गेली’ – शेवटी.

* * *

**वर्दळ–**

आडवळणाचा जिना निरुंदहि, वर्दळ ही त्यावरी ।
जिन्याची, सोळावी पायरी ॥ १ ॥
नसे भरवसा इथे कुणाची, होइल ती वंचना ।
सहजि वा, ठेवुनि जाइल खुणा ॥ २ ॥
अधिर मनाच्या बधिर स्थितीचा, अनुभव हा वेगळा ।
रुजे कधि, अंकुर कीं कोंवळा ॥ ३ ॥
अंग चोरूनी जाता येता, कुणास तो निसटता ।
बसतसे, मुका मार हा रिता ॥ ४ ॥
दिसेल जरि परि कुठे असा तो, कठडाही खिळाखिळा ।
तरी मग, गोन्धळ हा सावळा ॥ ५ ॥
शापच तिजला गुपित गोष्टही, षट्कर्णी हो परी ।
वागता, सोडुनि ती पायरी ॥ ६ ॥

* * *

## भूत बंगला–

सजवीत असते भूत बंगला भुतावळ, स्मशानांत
ठेवून राखण, पिशाच्यांचीच
बनविली जाते पत्रावळ, टाचून, ठेवण्यासाठीं चव्हाटयावर
उष्टया गुळण्यांची खीर, पसरून गुलाल निशाणीचा
उतारा म्हणून
करीत असते ' छू ' पिशाच्यांना, घेताना अंदाज झपाटलेल्यांचा
आणि
दिसते दाखवताना दिमाख, पाठीच्या कोनडयातून डोकावणाऱ्या
प्रौढीच्या बेगडी मिरासदारीच्या, करणीचा
उष्णतेमुळे सूर्याच्या, तापलेली वाळूच होते जास्त तापदायक
सूर्यापेक्षा
खाताना लोणी मृताच्या टाळूवरचे, उरलेले चोपडले जाते
मृतालाच
घेऊन दक्षता रचलेल्या चितेची, जळताना आवाज न होऊ देण्याची
न ढासळता मृताकडून–
तेव्हा
जाणून हसताना दिसतो उपहास ' खदखदा '
डागळलेल्या प्रभावळीला

* * *

## रोजखर्डा–

फार वर्षांनी मित्र एकत्र जमले
चतुर्भुज चावटपणाचा रोजखर्डा पुसू लागले
चार असो वा सहा असो, खाणाखुणांत मजा खरी
मनासारख्या भिडू शिवाय, काय ! 'लॅडिस' रंगेल तरी ?
कधीं ओढाव लागत, कधीं ओढूही द्याव लागत
'पांच तीन दोन' च्या खेळांत, ओढल पान मंजूर असत
आशिर्वादच म्हणे फिक्का, म्हणून एक उणे आहे
'सात हाती' ची गोळा बेरीज, कुणी ठासून सांगतो आहे
अरे यार पूछो मत्, वंशाचा दिवा लावायला हवा
कल् की बात कल बोले, मिळाला 'झब्बू' घ्यायलाज हवी
एक अगदीच गप्प वाटला, दाटल शादी नसेल केली
सर्वच मुसळ केरांत म्हणतो, एक 'सिक्सर' ठेवून दिली
गुड वुइशेस आहेत खऱ्या, एकापेक्षा एक स्ट्राँग !
बट माय पेशन्स डोन्ट अंडरस्टयांड 'व्हेर इट गोज ऑलवेजराँग?'

* * *

## आडकाठी–

डोळ्यांत वाच माझ्या, तू गीत भावनांचे ।
वाचू कशी ? परन्तू, ते वाचतां न येते ! ॥
'रिम्लेस' जाड भिंगे, येतात आड की ही ।
माझे मलाच दिसते, प्रतिबिंब त्यांत तेही ॥

* * *

## पेंच–

नांव होत विश्वामित्र – तपश्चर्या अहोरात्र
कैक तपे होऊन गेली, देवेन्द्रालाही काळजी पडली
तपोभंग योजना आखली, मेनकेची नेमणूक झाली
शेजारतीतून लाच दिली, पुराव्यासह पुढे आली
सरळ झटकून मोकळा झाला, तो कच्छविच्छेदनी पेंच
बोले सब झूट है– ' तो मी नव्हेच '

* * *

## गालबोट–

दिसे अंगना, प्रचंड ती ही ।
घडचाळ, अयनक, प्रचंड तेही ।।
कर्णभूषणे, झांजा समही ।
अंगठीचे ते पेपरवेटहि ।।
साडी वरती, चंड फुलेही ।
प्रचंड तो हा अंबाडाही ।।
त्या कचकोशी, गालबोट ते ।
बटन फूल हे, शेवन्तीचे ।।
खास शोभली असती साची ।
वेणी तेथहि, ' केळफुलांची ' ।।

* * *

## ' चोरांची ' पाउले–

नकळत हसलो, बघता आपण
वळुनि पाहिले, नकळतही पण
आणिक नकळत, आपुले आपण
कळले गमवुनि बसलो आपण
वेळ पकडण्या अचूक आपण
दिसू उभयता रेंगाळत पण
नजर चुकवुनी परि तें आपण
अडते पाउल, छपवू आपण
उलट दिशेला, जाता आपण
दिशा बदलुनी, वळलो आपण
लोप पावली, नकळतही पण
स्निग्ध मुग्धता, आपुली आपण
आपणासही, कळलो आपण
उरे न किन्तू, हो खातरपण
कल्पिताहुनी, गमे विलक्षण
मीलनांतरी, मोहरती क्षण–

मराठी ग्रंथ संग्रहालय
२३९३ ३/२५
२७८/२

* * *

## प्रेम–पत्र–

बिम्बाहुनि प्रतिबिम्ब सुखावह
स्मृती चिरंतन मनीं डहुळते ।
दोन जिवांची मनधरणी ही
झरणी मधुनी झरझर झरते ॥

* * *

# एकमात्रा ' लूप ' ही–

थांबवाया पाळणा हा, काय चिंता एवढी ?
सोय आता केवढी !

कीं जगाने तेथ व्हावे, पाहता की थक्कही
एक मात्रा 'लूप' ही–

भोग–तृष्णेच्या नद्या की, वाहती ओथंबुनी
राहती ना थोपुनी

थोपवीता ये न बोले, मन्मथाची लाट ही
एक मात्रा ' लूप ' ही –

की पडेही आणि पाणी, पालथे पाहू घडे
वाजता ही चौघडे

आणि तो हा पाळणा दे, ती फितूरी साक्ष ही
एक मात्रा ' लूप ' ही –

सूति-विस्तारात पाही, वाहती दाही दिशा
' फॅमिली ' ची दुर्दशा

ना परीही ' कार्यकर्ते ' पाळिती ते पथ्यही
एक मात्रा ' लूप ' ही –

कीं कृपेने ईश्वराच्या, हा पाळणा हालतो.
सांगता ना लाजतो

फक्त मात्रा ती न चाले, बायकांची येथही
एक मात्रा ' लूप ही –

दोन वा ती तीन व्हावी, लेकुरे ना कायदा
सौलतीचा फायदा

कीं न घ्यावा वाढवीता, सौख्य–त्रिज्या तेथ ही
एक मात्रा ‘ लूप ’ ही –

* * *

**साद–**

लोपला तो मी पणा हा
मी न माझी राहिले

जे हवे होते मला ते
ठायीं तुझ्या मी पाहिले

कीं हवीशी साथ वाटे
सांग का देशील तू ?

घालते कीं साद तुजला
देशील का ? प्रतिसाद तू

कीं करोनी धीर पुसते
म्हणशील का मजला तुझी !

वाहिली काया तुला मी
झाले मनानें मी तुझी–

* * *

## (आड) रान गीत– (शहर आवृत्ती)

(श्री. अनंत काणेकर यांची क्षमा मागून)

चल रे ! सजणा फिरावया–हितगुज मनीचे करावया !
प्रथम इराण्याकडे चला– कीं देईन मी चहा तुला–
पुसे असा का ? अडखळशी !
बावरुनी कीं का बघशी ?
रेस्टारंटहि दूर असे
ओळखिचे ना ये कुणिसे
रूम फॅमिली असे इथे
निवांत जाउनि बसू तिथे
' पाठकरुनि हा कोण बसे !
चाळीतिल कोणि पुसे !'

नसे कोणिही चाळीतला, इश्य ! उगा का बावरला !
स्पेशल रुमहि पहा कशी
निवांत आणिक हवी तशी
बघू दर्पणी त्यांत कसे
दोघांचे प्रितिबिंब हसे !
" अवचित टकटक ये श्रवणीं
बघे तिथे बावरुनी "

नको घाबरू नसे कुणी, आरशा वरती बघ चिमणी
सांगुनि धाडित आमलेट
वेटरसी करण्या ' लेट '

की घे खुर्ची सरकवुनी
बन् पारवे क्षण बघुनी
" घूं घूं करितसे कोण असे
पुसे काय घे कोनोसे ? "

ना कानौसे घेत कुणी, घुमत पारवा बघ वरुनी–
भारिच बाई घाबरशी
लाजाळूसहि लाजविशी
घड्याळ घडिघडि नको बघू
पर्स सावरित म्हणे निघूं

" नाराज न हो ऐक जरा, चहा सांगुया थांबु जरा "
पुनरपि दावूनि 'बेल' अशी
चहा सांगते त्या सरशी
हासत जणु की 'जितम्मया'
परी सुटे तो घाम तया
अधरि क्षणीं तो कळवळला
म्हणत विमा ना उतरविला

" उतरविशी तू विमाजरी–एक नॉमिनी मला करी "
आनत वदने जाताही–हसत इराणी त्या ठायीं

* * *

## कृपा–

आभाळातुन पडतय सोन, मोती पिकती पहा इथे ।
गहूं, बाजरी, आणि जोंधळा, कणसे डुलती अहा ! तिथे ॥
भगवन्ताची कृपा कृपाही, उणे न म्हणती कीं काहीं ॥
जात्यावरती तिथे कंकणे, गातिल ओव्या मग त्याही ॥
सुटेल वैरण बैलांना मग, मोट सोडिता माध्ध्यांनी ।
श्रमपरिहारा थोपटुनी दे, थाप पाठिवर मायेनी ॥
भाजी भाकर लसूण कान्दा, मिरची चटणी त्यावरती ।
पिवून पाणी देतील ढेंकर, जेवण चाले ‘ सांगाती ’
ढवळ्या-पवळ्या गळा घुंगरू, शिंगा शेंबी पितळेची ।
बाजारी मग निघता गाडी, मुखीं लावणी ‘ इष्काची ’ ॥
बरकत येता हरकत कुठली, गळा माळ ही पुतळ्याची ।
गृह-लक्ष्मीला लुगड-चोळी, आणि बांगडी कांचेची ॥
लई मागण नाही म्हणती, हात जोडुनी देवाला ।
पोटा पुरत देवुनि देवा, सुखी ठेवही जगताला ॥

* * *

## पहिले चुंबन–

अशी येता देखे तनुनिकट ती जाणुनि क्षणीं ।
द्वये बाहूमध्ये, विळखि चघळी रक्त जिवणी ॥
मनी वाटे स्वर्गःसुख उतरुनी येई धरणी ।
अचंबावे मनुजे, अद्भुत किती ईशकरणी ॥ १॥

* * *

(कै. मायदेव यांची क्षमा मागून)

बघा हा डौल– जरी नसे घराला कौल–
यौवन आरवे शिरीं कोंबडा
टॉप टेरिलिन टाइट कपडा
पदन्यास जणु नृत्य भांगडा
म्हणे स्टाईल-- जरी नसे घराला कौल–
नखशिखांतही ते म्याचिंगहि
केश भार हो तो सेन्सॉरहि
पाठपुरावा, पाठांतरही
पदर स्टाईल– जरी नसे घराला कौल–
फॅड आणखी ते स्लीमिंगहि
त्यातच बॉटम–टॉपलेसही
चाल कोस जणू कापडासही
सिने स्माईल– जरी नसे घराला कौल–
लावु नये परि लागे दृष्टहि
तलम पोटिमा स्थूल त्यात ही
दही टांगल्या सम तनु दिसतहि
हौस बिनमोल, जरी नसे घराला कौल–

* * *

...आ ४

## आई–

आई भरवी दूधभात हा, छान सांगते कीं गोष्ट ।
रोजरोज ती संध्याकाळी, आणि काढिते कीं दृष्ट ॥
बाग जपानी गम्मत जम्मत, खेळायाला ती नेते ।
रविवार ती सुट्टी आमुची, मजेत सारी कीं जाते ॥
मागे पुढती पाट जेवता, ताटवाटिही चांदीची ।
गोड करंज्या वाढदिवस की, भेट साखळी सोन्याची ।
नवे नवे ते कपडे घालुनि, करील कौतुक ते पाही ।
परी मळविता बसे धपाटा, नेंम नसेही तो कांहीं ॥
गम्मत जम्मत एक आणखी, सांगु नका हो कोणाला ।
रागे भरते बाबालाही, घाबरते पण आजीला ॥

* * *

## गर्व हरण–

नांव होत रंभा, स्वरूपाच्या भलताच टेंभा–
पैजेचा विडा उचलला म्हणे शुक ? काय! शून्य मिन्टाचा मामला!
स्वर्गीय शृंगार, निथळून निघाला, त्याच पावली पृथ्वीवर आला
डोळे मिटून ध्यानस्त होता, निथळला ‘ शृंगार ’ फुकट होता
म्हणून जाणून शुक–शुक केलं, त्यान डोळे उघडून पाहिलं
स्वर्ग सुखीचा मळा बोलला, म्हणे येताऽ रोंभा-सोंभा खेळायला ?
मिचकला डोळा, लचकली कंबर, पाहून म्हणाला ‘ राँगनंबर ! ! ’
निष्प्रभ ठरला मोह पाश सारा, म्हणाली, आयल्ला ! ! ग्रेट आहे खरा
शरमिंदी होऊन स्वर्गात परतली, इंद्रादि म्हणाले, बया हरली बया हरली–

* * *

## पाहुणी–

कानशिलावर केस चिकटले, घामाने पाहुनी ।
चिकटले, मन तेथे जाउनी ॥ १ ॥
थेंब असा कीं गोफण गोटा, जिव्हारीच लागला ।
मधोमध, भुवयांच्या गोन्दिला ॥ २ ॥
घट्ट पकडुनी टोंक एक ते, वाहत्या पाण्यातुनी ।
देत ती, लुगडे भिर्कावुनी ॥ ३ ॥
खेचुनि घेता, हळूहळू ते, जीव जात खेचला ।
खुषीचा, मिस्किल हा मामला ॥ ४ ॥
अधर दाबुनी, हसता दिसते, पिळता पिळता पिळा ।
पिळित जणु, हृदयच कीं चंचला ॥ ५ ॥
झाले धुवुनी, धुणे निघाली, ती पाटी घेवुनी ।
धुण्याची, कोण ? नवी पाहुणी ॥ ६ ॥

* * *

## गझल –

देव घरांतिल विझे दीप हा, रिता चंदनी देव्हारा ।
वृथा डोकवुनि बघू नका ते, दरवाजाही बंद करा ॥
कीं प्रकाश इथुनी आज पहा लोपला ।
काळोख उरीं हा पुरेपूर दाटला ।
तो प्रणय गोफ कीं अपुराही राहिला ।
देव्हारा हा मोडुनि आता, उटी उगाळुनि लावीन ।
निर्माल्यचि की स्मृतिगंधासह, शापित जीवन कंठीन ।

* * *

द्वारका ठोकिता, करांगुलीने, बंद शयनगृह दिसे
कोण ते ? कीं भामा पुसतसे-

माधव वदता, त्यास जाणुनी, प्रश्न करी त्याजला
कोण तो, वसन्त का ? पातला-

वसंत नोहे तिला सांगतो, चक्रधारी मी असेच
अससि का, कुलाल ? ती पुसतसे-

कुलाल नोहे कुटिले ! मी हा, धरणीधरही पहा
शेष का ? जिव्हाद्वय युक्त हा-

शेष नसे मी क्रूर कालिया- मर्दन कर्ता असे
गरूड का ? खगपति ती त्या पुसे-

गरुड नसे तो ऐक ऐक की, खुद्द हरिच मी असे
अससि का ? कपिश्रेष्ठ पुसतसे-

होय पराजित चक्रपाणी हा, प्रत्युत्तरि तेधवा
उघडितें, बंद द्वार माधवा-

दिल् खुलासही हसुनि खदखदा, नेवुनी त्या बैसवी
मंचकी, मधुसूदन रंजवी-

* * *

## क्षितिज-

फक्त पुरेसा, एक इशारा
होत भावना, लुळी पांगळी
कैफ साहसी, कवटाळिल कीं
शूलावरची, ती ही पोळी-

हपापलेले, लोचट लोचन
एकच त्यांचे, दिसे घराणे
चढाओढ ती, कीं जिंकाया
त्या नजरेचे, नजर तराणे-

हसेल मनिचे, मृगजळ तेही
क्षणोक्षणीही, फुलविल आशा
दावि वितळता, नितळ क्षितिजही
स्फटिक मनांतिल, मीलन रेषा-

दिसेल वळता, नजर खालती
त्या मिटल्या करशाखावरती
शब्द आर्जवी, अधरावरती
पदांगुष्ठहि, उकरित माती -

* * *

## सौदा-

दिसे काश्मिरी सफरचंद की, अनार ते मस्कती ।
एकच घरच्या बागा दोन्ही, अहा ! बहरल्या किती ॥
बघ माचाळा वरूनी सुटती, नयनांच्या गोफणी ।
फटका बसता घायाळचि हो, वाटसरू तत्क्षणी ॥१॥

डौलदार परि रावा बघुनी, गोफण ही थांबली ।
विसरूनि राखण हळूच आणिक, धरणीवर उतरली ॥
बागा स्वाधिन करूनि जखडिला, रावा करपंजरी ।
नजरबंदिचा सौदा बुजरा, पटला अधरावरी ॥२॥

* * *

## मानभंग –

नेत्र कटी नी उरोज पाहुनी, वदन तसेही ललनांचे
पराभूत कै? कोण? पत्करी, दूरगमन वा मरणाते –
मदनाचे वरदान तिला हे, यौवन बहरे परोपरीं
नारीचा ना दोष त्यातही, पराभूत ते मन वैरी
कीं मोठ्यांचा स्वभाव ऐसा, मानभंग हा होत जरी
दूरगमन वा मरण असे ते, पत्करती कै ऐक तरी–
कीं ते मृग स्त्री नेत्र पाहुनी, कटी पाहुनी मृगेन्द्रही
वनांतरी ते गिरिकुहरी कीं, जातिल दिसता निघोनिही
उरोज पाहुनी पराभूत तै, दिग्गज जाती दिशांतरी
वदन पाहुनी कमल-खंडही, शिरता दिसतिल उदक उरी

* * *

## चुरस–

घरोघरीं त्याच परी, नारीमध्ये चुरस भारी
कुणीकुणाची कुडी पहावी, लागलीच तश्शी करून घ्यावी
किलवर छाप बिलवर दिसले, भर घालून नवीन केले
गोठ-पाटल्या घाट नवा, अगदीं तस्साच व्हायला हवा
गाठून घेतल मंगळसूत्र, तिच तेच हिच गोत्र
पोत चांगल रंगीत पातळ, दुकान तेच पण हिचच नित्तळ
शेवटीं चुरस इतकी वाढली, कीं 'कवळी'सुद्धा करून घेतली

* **

## आस्था–

हातात बॅग, शिकलेला दिसला
घाईघाइनं बुक डेपोत आला
मालकास बाजूस, बोलावून घेतलं
हळूच काही कानांत सांगितल
मालक हसत, परत आला
तोही घाईन निघून गेला
त्यांची 'ही' म्हणे नोकरीला जाते
पोरांच्या शिक्षणाची आबाळ होते
कौतुक वाटल, शिकलेल्या मस्तकाच
हव होत गाईड 'बिगारी' च्या पुस्तकाच

* * *

लज्जत–

शेवाळी ती रंग संगती
साडी चोळी हिरवी हिरवी
गुळी तिथे ना मुळी निराळी
काये माजी मिसळे बरवी ॥ १ ॥

कानशिलावर ठिपका हिरवा
तसाच हनुवर गोन्दविलेला
भुरळ पडावी बघता की ती
वळून बघता बघणाराला ॥ २ ॥

शीतलता ती रंगामधली
गमली की ती भांग जशी ही
भांग शिरीचा त्यात आणखी
अहा !! वाढवित लज्जत ती ही ॥ ३ ॥

जाणिव होता पदर सावरी
तेथ चुडा हा तो खळखळला
लज्जतिला त्या लज्जत आणी
वरचा मजला की ढासळला ॥ ४ ॥

नेत्र द्वयांनी तृप्त प्राशिता
रूप भांग कीं जगा विसरला
म्हणतिल कोणी भंगड जरिही
मुळी न त्याची खंत तयाला ॥ ५ ॥

* * *



भालु बोखार

## जीवन दर्शन–

जरीं असे हे घडले नसते, मनुजा जीवन कळले नसते
शेंदरा विना दगडालाही, देव कुणीही म्हटले नसते–
जरी वाजला नसता बाजा, लोक भोंवती जमले नसते
ताला शिवाय डोंबारी हे, कधीं नाचता दिसले नसते–
भालशृंगही ते जरि नसते, बहुल्यावरती चढले नसते
अर्ध्या हळकुंडाने कोणी, पिवळे होता दिसले नसते–
स्निग्ध जरी हे लोणी नसते, रुचली भाकर पचली नसती
पात्रतेस ती तिथे कधीं मग, अपात्रताही हसली नसती–
माणुसकीही मेली नसती, स्वार्थाचे जरि कुंपण नसते
कुम्पणा पर्यंत सरडे तेही, कधी धावता दिसले नसते–
मधाळ जरिही वाचा नसती, काळिज काळे लपले नसते
भगवंताचें नाम घेउनी, गळे कापले गेले नसते–
उडला नसता जरी मुलामा, पितळहि उघडे पडले नसते
जरी लाविली नसती बेगड, मखर तरी हे सजलें नसते–
सेवकास पड सेवक नसते, भिजत घोंगडे पडले नसते
उंटावरूनी शेळचांचे ही, कळप हाकले गेले नसते–
जरी ठेविले गेले नसते, शंख असे ते अडणी वरती
ती षोडशोपचारे पूजा, कीं ही तरि मग झाली नसती–
झाला नसता अपमान जरी, तरी नोकरी कळली नसती
तीर मारिता नथेतून ही, सुस्थ निवृत्ती जपली नसती–

पुढे चालतो तर आगाऊ !
मागे राहिलो तर टाकाऊ !
बरोबर चाललो – तर – ही हिंमत ?
नोकरीत नोकरांची हीच किंमत !

***

**शास्त्रीजी–**

उणा एक काना, तिथे शस्त्र पाही ।
पुरा शब्द कान्यासवे, शास्त्र तेही ।।
पहा शस्त्र नी शास्त्र, एकत्र येई ।
कृती तेथ बोले, न चाले बढाई ।। १ ।।

दिसे ठेंगणी मूर्ति, साधी सुधीही ।
पुरा आत्मविश्वास, नेतृत्व तेही ।।
स्वदेशासवेही, जगा जागविले ।
तिथे सार्थ ही नाम, ' शास्त्री ' जहाले ।। २ ।।

जरी शस्त्र शास्त्रातूनी, शब्द शास्त्री ।
परी शांतिचा हा, खरा होय यात्री ।।
तया कारणे, 'ताशकंदी' भरारी ।
करी स्वाक्षरी हा, करारी करारीं ।। ३ ।।

पहा वाळली ती न, शाई तिथेही ।
ठरे अन्तिचा शान्ति, संदेश तोही ।।
कसे दैव ते, दुर्विलासास साधी ।
पुजारीच तो, शांतिचा घे समाधी ।। ४ ।।

तनु त्यागिता कीर्ति, मागे उरावी ।।
मना सज्जना, हेचि क्रीया धरावी ।।
असे शब्द तेही, इथे सार्थ होती ।
नमू शांतिही शांतिही शांति ही ती ।। ५ ।।

* * *

## आमचे आम्ही–

(म्हणजे तुम्ही आणि आम्ही म्हणजेच–जनता)

या कानाचीं त्या कानाला, गोष्ट कधी कळली नव्हती
मंचक भास्कर, सुरतपुरीचे, कटिशूळाची गातीं महती–
लसूण आणिक कंदर्पाला, ये न दडवितां दर्प अंगिचे
सहस्त्राक्षाच्या मनी अहिल्या, मळमळ लक्षण प्रवृत्तीचें–
मुळांत मानव हे नर-मादी, स्थलकालाचे गुलाम सारे
भाद्रपदी ही विचार धारा 'खजुराहो' ची सारण सारे–

***

## सवाल जबाब–

सवाल–

'नासिक' त्यावर कर दोन्हीही, नार 'शिलेवार' उभी जरी
कसे वेधिती दृष्टि अशी ते, पुष्ट पयोधर स्पष्ट करी–

जबाब–

जिथे बांधिती तोरण ते ही, 'नासा' म्हणती बघ त्याला
दरवाजामधि नार उभी ती, उंबरठ्याला नाव 'शिला'–
तारुण्याच्या उंबरठ्यावर, नार दिसे ही उभी जरी
नासावर कर असो नसो वा, उरोज उन्नत स्पष्ट तरी ।।

***

## बोहोचक मावशी –

नांव होत काशी, तिला होती जर्रा मिशी
घरापुढ चौचाकी थांबली, पोरं धावली, आत्या आली आत्या आली
बंड्याला उचलून पापा घेतला, त्यानं लग्गेच पुसून टाकला

आईला अवचित प्रश्न केला, मिशा ग कशा आई ! आत्याला ?
बेबीला ते खपल नाही, म्हणे तली काका म्हणायच नाही

फाजिल मुलगा वेला कुतला, माठ्ठे डोळे दम दिला
आईन शांग्ल, विशल्ला वात्त, अलीकले झालाय भालीच शित्त !

* * *

REFBK-0021782
REFBK-0021782
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2393 31754
27612

## पंचनामा–

पंच पक्वांनाच्या ताटी, ना पापड कुडयांची दाटी ।
पै पक्वान्नी चवीसाठी, ' चांवट खाणे ' हवेची ॥
क्षणमात्र जरी झाला, रुची पालट चाखिता ।
' आलुबोखार ' अंशार्थी, सार्थ हो हीच सांगता ॥

* * *